आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३,०० वाजता

१२ जुलै २०२४ - शुक्रवार

असमानता रोखण्यासाठी शिक्षण ही सर्वात प्रभावी परिवर्तनशील यंत्रणा आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज मुंबईत केलं. नरसी मोनजी व्यवस्थापकीय शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करत होते. या संस्थेनं गेल्या अनेक वर्षांपासून देशाचं भविष्य घडवण्याच्या कामात मोठा हातभार लावल्याबद्दल त्यांनी प्रशंसोद्गार काढले. वैदिक काळापासून भारताला उच्च शिक्षणाची मोठी परंपरा असून प्राचीन भारतातल्या महाविद्यालयांनी समाजाला दिशा देणारी मूल्यं जपली आहेत, असं ते म्हणाले.

**<><><><>**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अकरा जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी आज मतदान सुरू आहे. दुपारी एक वाजेपर्यंत २४६ आमदारांनी मतदानं केलं आहे. दुपारी चार वाजेपर्यंत मतदान होणार असून त्यानंतर संध्याकाळी लगेच मतमोजणी होणार आहे. भाजपकडून पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे रिंगणात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे, शिवसेनेकडून माजी खासदार कृपाल तुमाणे आणि भावना गवळी, काँग्रेसकडून प्रज्ञा सातव निवडणूक लढवत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मिलिंद नार्वेकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाठिंब्याने शेकापाचे जयंत पाटील विधान परिषदेची निवडणूक लढवत आहेत.

**<><><><>**

मूळ अर्थसंकल्पातल्या तरतुदींइतका खर्च झालेला नसताना राज्य सरकारनं पुरवणी मागण्या मांडल्या. हे प्रकार टाळण्यासाठी योग्य अर्थसंकल्पीय मार्गांचा अवलंब करायला हवा असं निरीक्षण कॅग अर्थात नियंत्रक आणि लेखापालांच्या अहवालात नोंदवलं आहे. राज्याच्या वित्तव्यवस्थेचा २०२२-२३ आणि २०२३-

२४ या दोन आर्थिक वर्षांचा अहवाल विधानसभेत आज सादर झाला. त्यात हे निरीक्षण नोंदवलं आहे.

राज्य सरकारच्या मालकीच्या सातत्यानं तोट्यात असलेल्या कंपन्यांचा कारभार सुधारत नसेल तर त्या कंपन्या बंद करण्याची शिफारसही कॅगनं केली आहे. राज्य सरकारच्या मालकीच्या ११० कंपन्यांपैकी ४७ कंपन्यांनी १ हजार ८३३ कोटींहून अधिक नफा कमावला. त्यातला ९० टक्के नफा हा केवळ १० कंपन्यांनी कमावला होता. काही कंपन्या वेळेत आर्थिक अहवाल सादर करत नसल्याबद्दलही कॅगनं नाराजी व्यक्त केली आहे.

गेल्या ५ वर्षात वेतन, निवृत्तीवेतन आणि कर्जावर व्याज यावर होणाऱ्या खर्चात सरासरी ११ टक्के वाढ झाली. २०२२-२३ या आर्थिक वर्षात वित्तीय खर्चाच्या तुलनेत ५४ टक्क्यांहून अधिक रक्कम या गोष्टींवर खर्च झाली होती. यामुळं प्राधान्य क्षेत्राकडे लक्ष देता येत नसल्याचं कॅगनं अहवालात नमूद केलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या विविध घटकांना शैक्षणिक प्रवेशासाठी असणारी नॉन क्रिमीलेयरची आठ लाख रुपयांची वार्षिक उत्पन्नमर्यादा वाढवण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे, अशी माहिती इतर मागास  बहुजन कल्याण प्रवर्ग विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी आज विधानसभेत दिली. याबाबतची लक्षवेधी सूचना संजय गायकवाड, नितीन राऊत आणि इतरांनी उपस्थित केली होती.

२०१३ सालच्या नवीन भूसंपादन कायद्याबाबत देशातल्या विविध उच्च न्यायालयांनी दिलेले निवाडे उपलब्ध करून घेऊन या महिना अखेरपर्यंत या कायद्यात सुधारणा करण्यासाठी कारवाई केली जाईल, अशी ग्वाही विखे पाटील यांनी दिली.

विधानसभा सदस्य रत्नाकर गुट्टे यांच्याशी गैरवर्तन केल्याबद्दल परभणीचे तत्कालीन पोलीस अधिक्षक जयंत मीणा  यांच्याविरोधात कारवाई करण्याची

शिफारस आज विशेषाधिकार भंग समितीने सरकारला केल्याची माहिती आमदार राहुल कुल यांनी सभागृहाला दिली.

**<><><><><>**

नीट परीक्षा गैरव्यवहार प्रकरणी सीबीआय कोठडीत असलेला आरोपी एन. गंगाधरन याच्या कोठडीत लातूरच्या न्यायालयानं आणखी चार दिवसांची वाढ केली आहे. त्याची कोठडी काल संपल्यानं त्याला न्यायालयात हजर केलं होतं.

दरम्यान, या प्रकरणी लातूरमध्ये गुन्हा दाखल असलेला ईरंना कोनगलवार हा अद्याप फरार असून त्याला अटक करण्याचं मोठं आवाहन सीबीआयपुढं आहे.

**<><><><><>**

औरंगाबाद प्रारूप प्रकरणी इसिसच्या दोन सदस्यांवर राष्ट्रीय तपास संस्थेनं आज आरोपपत्र दाखल केलं. दहशतवादी कारवाया प्रकरणात सहभाग, देशभरातल्या युवकांची दहशतवाद प्रकरणात सहभागी होण्यासाठी नियुक्ती करण्याचं काम त्यांच्याकडे होतं, असं यात नमूद केलं आहे. फेब्रुवारी महिन्यात यापैकी एका आरोपीला NIA नं पकडलं होतं.

**<><><><><>**

प्रवासी तसंच कामगारांच्या समस्या आणि तक्रारी स्थानिक पातळीवर सोडवण्यासाठी येत्या सोमवारपासून आगारनिहाय "प्रवासी राजा दिन" आणि "कामगार पालक दिन" आयोजित केला जाणार आहे. या उपक्रमाच्या अंतर्गत संबधित विभागाचे विभाग नियंत्रक वेळापत्रकानुसार एका आगारात जाऊन सकाळी १० ते २ या सत्रात प्रवाशांच्या लेखी तक्रारी स्वीकारणार आहेत. राज्यभरातल्या सगळ्या आगारांत दर सोमवारी आणि शुक्रवारी या दोन्ही उपक्रमांचं आयोजन केलं जाणार आहे.